# डॉ. वर्षा पाटील वुमन्स महाविद्यालयाची यप्पी टेक्नॉलॉजी आयटी कंपनीला भेट !

जळगाव - डॉ. वर्षा पाटील वुमन्स महाविद्यालयाची यप्पी टेक्नॉलॉजी आयटी कंपनीला भेट, कंपनीचे संचालक कल्याण दाणी यांनी विद्यार्थ्यांनीना कंपनीची सुरुवात कशी झाली, कंपनीची नोंदणी या सगळ्या बाबी विद्यार्थ्यांना सांगितल्या.

यप्पी टेक्नॉलॉजी ही एक आयटी माहिती तंत्रज्ञान कंपनी आहे. जी जगभरातील व्यवसायांना कस्टम सॉफ्टवेअर डेव्हलपमेंट आणि डिजिटल मार्केटिंग सारख्या सेवा पुरवते त्यांनी माहिती आणि तंत्रज्ञान क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण केली असून व्यवसायांना डिजिटल माध्यमातून पुढे जाण्यासाठी मदत करते.

यप्पी टेक्नॉलॉजी या कंपनीने स्वतःचा अँटिव्हायरस देखील तयार केलेला आहे, राम अँटिव्हायरस या नावाने त्याची विक्री केली जाते. कंपनीचे पुढील ध्येय हे सायबर सेक्युरिटी क्षेत्रात काम करण्याचे आहे त्या दृष्टीने त्यांनी काही ॲप सुद्धा तयार केली.

विद्यार्थ्यांनीनी शेवटच्या सत्रात कल्याण दाणी यांना इंटर्नशिप, डेटा सायन्स, ए आय यावर प्रश्न विचारले त्यांची सखोल उत्तरे कल्याण दाणी यांनी विद्यार्थ्यांनीना दिली.

कंपनी भेटीचे आयोजन प्रा. योगिता घोंगडे व प्रा. शिवानी महाजन यांनी केले.